# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

परिपत्रक क्र.१९३/२०२३

सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, परिपत्रक क्र.४१/२०२३, जा.क्र.एएन/८८८, दि.११/०३/२०२३ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) सभा शनिवार, दिनांक ११ मार्च, २०२३ व रविवार, दिनांक १२ मार्च, २०२३ (रविवार सुट्टीच्या दिवशी) आयोजित करण्यात आलेली असल्याने रविवार, दिनांक १२ मार्च, २०२३ या सुट्टीच्या दिवशी विद्यापीठ कार्यालय हे नेहमीप्रमाणे सुरु ठेवण्यात आलेले होते. या सुट्टीच्या दिवशी विद्यापीठ कार्यालयात नियमित कार्यालयीन/ सभेबाबतचे कामकाज पार पाडण्यात आले असून सदर दिवसाची पर्यायी सुट्टी **बुधवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी ''नारळीपौर्णिमा/रक्षाबंधन''** या सणाकरिता जाहीर करण्यात येत आहे.

सबब, बुधवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी विद्यापीठ कार्यालय बंद राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
जा.क्र. : एएन/२७८७.
दिनांक : २९ ऑगस्ट, २०२३.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.